# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## सामान्य काळातील तिसावा रविवार

## सांयप्रार्थना

*महत्वाची सूचना : सदर प्रार्थना ही ख्रिस्तसभेची अधिकृत प्रार्थना आहे. कोविड १९ चा प्रादुर्भाव लक्षात घेता ही प्रार्थना आपण आपल्या कुटुंबात एकत्रित करावी ही नम्र विनंती.*

चरण: हे देवा, आमच्या सहाय्यास ये.

प्रतिसाद: हे प्रभो, माझ्या सहाय्यास धावून ये.

**पि**ता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

गीत : सामान्यकाळातील गीत

**स्तोत्र - ११० : १ - ५, ७**

प्रतिगीत १ : मलकीसदेकाच्या संप्रदायानुसार ख्रिस्त प्रभू युगानुयुगाचा याजक आहे, आल्लेलुया!

**मा**झ्या प्रभूला परमेश्वर म्हणतो,
मी तुझे वैरी तुझे पदासन करीपर्यंत
तू माझ्या उजवीकडे बैस.

**प**रमेश्वर तुझे बलवेत्र सियोनेतून पुढे नेईल;
तो म्हणतो, तू आपल्या शत्रूवर प्रभुत्व कर.

**तु**झ्या पराक्रमाच्या दिवशी तुझे लोक संतोषाने पुढे होतात,
पावित्र्याने मंडित झालेले तुझे तरूण
तुला पहाटेच्या दहिवरासारखे आहेत.

**प**रमेश्वराने शपथ वाहिली आहे
आणि ती तो बदलणार नाही;
ती अशी की, मलकीसदेकाच्या संप्रदायाप्रमाणे तू युगानुयुग याजक आहेस.

**तु**झ्या उजव्या हाताकडे असलेला प्रभू
आपल्या क्रोधाच्या दिवशी राजांचा बीमोड करील;

**मा**र्गाने चालत असता तो ओहोळातले पाणी पिईल;
आणि आपले डोके वर करील.

**पि**ता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

प्रतिगीत १ : मलकीसदेकाच्या संप्रदायानुसार ख्रिस्त प्रभू युगानुयुगाचा याजक आहे, आल्लेलुया!

*****

स्तोत्र ११५ : १ - १८

प्रतिगीत २ : आपला देव स्वर्गात आहे. त्याच्या इच्छेनुसार करण्यास तो समर्थ आहे, आल्लेलुया.

**हे** परमेश्वरा, आमचे नको, आमचे नको,
तर आपल्या नावाचे गौरव कर;
कारण तू दयाळू व सत्य आहेस.
ह्यांचा देव कोठे;
असे राष्ट्रांनी का म्हणावे?

**आ**मचा देव स्वर्गात आहे;
त्याला योग्य दिसते ते सर्व तो करितो.
त्यांच्या मूर्ती केवळ सोनेरूपे आहेत;
त्या मनुष्यांच्या हातच्या कृती आहेत.

**त्यां**ना तोंड आहे पण बोलता येत नाही;
त्यांना डोळे आहेत पण दिसत नाही;
त्यांना कान आहेत पण ऐकू येत नाही;
त्यांना नाक आहे पण वास येत नाही;

त्यांना हात आहेत पण स्पर्श करिता येत नाही;
पाय आहेत पण चालता येत नाही;
त्यांच्या कंठातून शब्द निघत नाही.
त्या बनविणारे व त्यांच्यावर भाव ठेविणारे सर्व त्यांच्यासारखे बनतात.

हे इस्त्राएला, परमेश्वरावर भाव ठेव;
तोच त्यांचा साहाय्यकर्ता व त्यांची ढाल आहे.
हे अहरोनाच्या घराण्या,
परमेश्वरावर भाव ठेव;
तोच त्यांचा साहाय्यकर्ता व त्यांची ढाल आहे.

अहो परमेश्वराचे भय धरणाऱ्यांनो,
परमेश्वरावर भाव ठेवा;
तोच त्यांचा साहाय्यकर्ता व त्यांची ढाल आहे.
परमेश्वराने आमची आठवण केली आहे;
तो आशीर्वाद देईल,
इस्त्राएलाच्या घराण्याला आशीर्वाद देईल,
अहरोनाच्या घराण्याला आशीर्वाद देईल.

परमेश्वराचे भय धरणाऱ्या लहानथोरांस
तो आशीर्वाद देईल.
परमेश्वर तुमची अधिकाधिक वाढ करो.
तुमची व तुमच्या मुलांची वाढ करो.

आकाश आणि पृथ्वी ही निर्माण करणाऱ्या परमेश्वराचा
तुमच्यावर आशीर्वाद असो.
स्वर्ग तर परमेश्वराचा आहे;
पण पृथ्वी त्याने मानवजातीला दिली आहे.

मेलेले म्हणजे नि:शब्दस्थानी उतरलेले
कोणीही परमेशाचे स्तवन करीत नाहीत;
पण आम्ही येथून पुढे सर्वकाळ
परमेशाचा धन्यवाद करीत राहू.
परमेशाचे स्तवन करा.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

प्रतिगीत २ ः आपला देव स्वर्गात आहे. त्याच्या इच्छेनुसार करण्यास तो समर्थ आहे, आल्लेलुया.

*****

काव्य - प्रकटीकरण १९ : १,२, ५-७

प्रतिगीत ३: प्रभूच्या लहानथोर अशा सर्व दासांनो, त्याचे स्तवन करा, आल्लेलुया.

'आल्लेलुया', तारण, गौरव व सामर्थ्य ही आमच्या देवाची आहेत; (प्र. आल्लेलुया)

कारण 'त्याचे न्याय निर्बंध सत्याचे' व 'नीतीचे' आहेत. प्र. आल्लेलुया (आल्लेलुया).

आल्लेलुया अहो आमच्या देवाची भीती बाळगणाऱ्या
सर्व लहानथोर दासांनो त्याचे स्तवन करा, (प्र. आल्लेलुया)

'आल्लेलुया', कारण सर्वसमर्थ आमचा 'प्रभू' देव ह्याने राज्य हाती घेतले आहे. (प्र. आल्लेलुया)

आपण आनंद व उल्हास करू व त्याचे गौरव करू; प्र. आल्लेलुया (आल्लेलुया).

आल्लेलुया, कारण कोकराचे लग्न निघाले आहे,
आणि त्याच्या नवरीने स्वत:ला सजविले आहे. प्र. आल्लेलुया (आल्लेलुया).

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

प्रतिगीत ३ ः प्रभूच्या लहानथोर अशा सर्व दासांनो, त्याचे स्तवन करा, आल्लेलुया.

*****

शास्त्रवाचन २ थेस्सलनी २: १३ - १४

बंधुजनहो, प्रभूच्या प्रियजनांनो, तुम्हाविषयी आम्ही देवाची उपकारस्तुती नेहमी केली पाहिजे; कारण आत्म्याच्या द्वारे होणाऱ्या पवित्रीकरणांत व सत्यावरच्या विश्वासात देवाने तुम्हाला प्रथमफळ म्हणून तारणासाठी निवडिले आहे; त्यात त्याने तुम्हास आमच्या सुवार्तेच्या द्वारे आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचे गौरव प्राप्त करून घेण्यासाठी पाचारण केले आहे.

## लघु प्रतिसाद

प्रतिसाद: आमचा प्रभू थोर व सामर्थ्यशाली आहे.

प्रतिसाद: आमचा प्रभू थोर व सामर्थ्यशाली आहे.

चरण: त्याच्या बुद्धीला सीमा नाही.

प्रतिसाद: आमचा प्रभू थोर व सामर्थ्यशाली आहे.

त्रैक्य स्तुती: पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो.

प्रतिसाद: आमचा प्रभू थोर व सामर्थ्यशाली आहे.

## मरियेचे स्तोत्र: लूक १:४६-५५

मरियेच्या स्तोत्राचे प्रतिगीत ꞉ जकातदार देवासमोर नीतिमान ठरून आपल्या घरी निघून गेला, कारण जो कोणी स्वत:ला उंच करितो तो नमविला जाईल आणि जे कोणी स्वत:ला नमवितो तो उंच केला जाईल.

‘**मा**झा जीव प्रभूला’ थोर मानितो
आणि ‘देव जो माझा तारणारा’
त्याच्यामुळे माझा आत्मा ‘उल्हासला आहे;’

**का**रण ‘त्याने’ आपल्या ‘दासीच्या दैन्यावस्थेचे अवलोकन केले आहे.’
पाहा, आतापासून सर्व पिढया मला धन्य म्हणतील;

**का**रण जो समर्थ आहे, त्याने माझ्याकरिता महत्कृत्ये केली आहेत;
आणि ‘त्याचे नांव पवित्र आहे,’
आणि जे ‘त्याचे भय धरितात,
त्यांच्यावर त्याची दया पिढयान्‌पिढया आहे.’

**त्या**ने आपल्या बाहूने पराक्रम केला आहे;
जे आपल्या अंत:करणाच्या कल्पनेने ‘गर्विष्ठ आहेत
त्यांची त्याने दाणादाण केली आहे.’

‘**त्या**ने अधिपतींस’ राजसनांवरून ‘ओढून काढिले आहे,’
‘त्याने भुकेलेल्यांस उत्तम पदार्थांनी तृप्त केले आहे,’
व ‘धनवानांस रिकामे लावून दिले आहे.’

आपल्या पूर्वजांस' त्याने सांगितले 'त्याप्रमाणे आब्राहाम'
व त्याचे 'संतान ह्यांच्यावरील दया' सर्वकाळ 'स्मरून
त्याने आपला सेवक इस्त्राएल ह्याला साहाय्य केले आहे.'

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो.
जसा प्रारंभी होता तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

मरियेच्या स्तोत्राचे प्रतिगीत ः जकातदार देवासमोर नीतिमान ठरून आपल्या घरी निघून गेला, कारण जो कोणी स्वत:ला उंच करितो तो नमविला जाईल आणि जे कोणी स्वत:ला नमवितो तो उंच केला जाईल.

## मध्यस्थीच्या प्रार्थना

प्रतिसाद: हे प्रभो, तुझ्या दयेने आमची प्रार्थना ऐक.

शुभवर्तमानाद्वारे प्रभू येशूने त्याच्या गौरवात सहभागी होण्यास आपणांस पाचारण केले आहे. त्याच्याद्वारे स्वर्गीय पित्याकडे प्रार्थना करू या. प्रतिसाद: हे प्रभो, तुझ्या दयेने आमची प्रार्थना ऐक.

सर्व राष्ट्रांनी, शांतीचा मार्ग धरावा. मानवी हक्क व स्वातंत्र्याचा आदर करावा व साधनसामुग्रीचे उदारपणे वाटप करावे म्हणून आपण प्रार्थना करू या. प्रतिसाद: हे प्रभो, तुझ्या दयेने आमची प्रार्थना ऐक.

ख्रिस्तसभेच्या सर्व अधिकाऱ्यांनी तुझ्या वचनाची विश्वासूपर्ण सेवा करावी तसेच सर्व सभासदांनी आशेत व विश्वासात बळकट होऊन तिचे प्रेम सर्वांना द्यावे म्हणून आपण प्रार्थना करू या. प्रतिसाद: हे प्रभो, तुझ्या दयेने आमची प्रार्थना ऐक.

आपला समाज व कुटुंब याद्वारे आपल्याला प्रभूचा अनुभव यावा म्हणून आपण प्रार्थना करू या. प्रतिसाद: हे प्रभो, तुझ्या दयेने आमची प्रार्थना ऐक.

येत्या आठवडयात आपल्या कृतीद्वारे इतरांची सेवा घडावी व विश्रांतीत आपल्याला शांती लाभावी म्हणून आपण प्रार्थना करू या. प्रतिसाद: हे प्रभो, तुझ्या दयेने आमची प्रार्थना ऐक.

सर्व श्रद्धावंत मृतांना प्रभूच्या दयेने चिरशांती लाभावी म्हणून आपण प्रार्थना करू या. प्रतिसाद: हे प्रभो, तुझ्या दयेने आमची प्रार्थना ऐक.

आमच्या स्वर्गीय बापा ...

### समारोपाची प्रार्थना :

हे प्रभू देवा, आमची श्रद्धा दृढ बनव, आमची आशा बळकट कर, आमचे प्रेम प्रज्वलित कर, तुझी वचने आम्हाला प्राप्त व्हावीत म्हणून तुझ्या आज्ञांविषयी आवड आमच्यामध्ये निर्माण कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

प्रतिसाद : आमेन.

### समारोप विधी :

प्रभू आम्हाला आशीर्वाद देवो, सर्व वाईटांपासून आम्हाला सुरक्षित ठेवो आणि आम्हाला सार्वकालिक जीवनाकडे नेवो.

प्रतिसाद : आमेन.